
अग्रतश्चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु: ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र



## येळकोट येळकोट जय मल्हार




वर्ष ४७ वे

अंक १० वा

१० नोव्हेंबर २०२५

किंमत १ रुपया


## चंपाषष्ठीच्या हार्दिक शुभेच्छा!



श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था आणि चित्तपावन ब्राह्मण संघाचे
श्री लक्ष्मी पूजन पतसंस्थेचे व्हा.चेअरमन श्री. सुधीर दामले व सौ. दामले यांच्या हस्ते संपन्न.



श्री लक्ष्मी पूजनाच्या वेळी उपस्थित संस्थेचे विश्वस्त-कार्यकारी मंडळ
तसेच पतसंस्थेचे संचालक मंडळ.



भारतीय वायुदल दिनाच्या औचित्यावर नवी दिल्ली येथे झालेल्या
विशेष सोहळ्यात भारतीय वायुसेनेमध्ये विंग कमांडर पदावर कार्यरत
नाशिकचे आनंद विनायक आगाशे यांना
वायुसेनेचे शौर्य पदक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पदक प्रदान

## श्री परशुराम नागरी पतसंस्था आणि चित्तपावन ब्राह्मण संघाचे श्री लक्ष्मी पूजन उत्साहात

श्री परशुराम पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन आणि संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य श्री. सुधीर दामले व सौ. दामले यांच्या हस्ते श्री लक्ष्मी पूजन संपन्न झाले.

यावेळी संस्था विश्वस्त डॉ. विजय जकातदार , अध्यक्ष श्री. विजय साने, पतसंस्था चेअरमन श्री. अनिरुद्ध अभ्यंकर, दोन्ही संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## वर्धापन दिन स्नेह बंध मैत्रिणींचा

मैत्रिणींनो, सुंदर हालचाली, हावभाव, म्हणजे नृत्य! अशी जर व्याख्या मानली तर, आपण सगळ्या जणी, घरकाम करताना, स्वयंपाक करताना, नोकरी करीत असताना अनेक नृत्याविष्कार करीत असतो. नाही का? पण शास्त्रशुध्द नृत्याचे शिक्षण घेणे, एक कला जोपासणे आहे. नृत्यात फार मोठे प्राविण्य मिळालेली, एक प्रसिध्द नृत्यांगना म्हणजे श्रीमती रेखा नाडगौडा...

या वर्षी वर्धापनाच्या समारंभात प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती रेखा नाडगौडा उपस्थित राहणार आहेत. ही आपली मैत्रीण नाशिकची असल्याने कोणाची मैत्रीण, कोणाची नातेवाईक, कोणाची शिक्षिका असू शकेल.

तरी आपल्या नाशिकच्या या प्रसिध्द मैत्रिणीचे कौतुक करण्यासाठी व कौतुक पाहण्यासाठी सर्वांनी ह्या कार्यक्रमाला अवश्य उपस्थित राहावे.

आपण दरवर्षी एका सेवाभावी व समाजकार्य करण्याऱ्या संस्थेस देणगी देतो. या वर्षी 'मंगलरूप गोवत्स सेवा ट्रस्ट, नाशिक' ह्या संस्थेची निवड करण्यात आली आहे. तेथील ज्येष्ठ कार्यकर्त्या, व्यवस्थापक 'रुपाली गंगाधर जोशी' या धनादेश स्वीकारतील.

### * वर्धापन दिन - स्नेहबंध मैत्रिणींचा... *

**दिनांक :** शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर **स्थळ :** डॉ. बापये सभागृह, परशुराम भवन, सी.बी.एस., नाशिक **वेळ :** सायंकाळी ५.३० वा.

**कार्यक्रमानंतर अल्पोपहाराची व्यवस्था आहे. हेच निमंत्रण समजून सर्व मैत्रिणींनी कार्यक्रमास अवश्य यावे.**

### स्नेह बंध मैत्रिणींचा... आगामी आकर्षण - सहल


***दिनांक - २१ डिसेंबर, रविवार***

***स्थळ - अगत्य कृषी पर्यटन, सिन्नर***

***वर्गणी - १४०० रु. (प्रत्येकी)***



**सविस्तर माहिती वर्धापन दिनाच्या दिवशी, तसेच पुढील अंकात (डिसेंबर), व स्नेहबंध च्या व्हॉटस् अप ग्रुप वर देण्यात येईल.**



## डॉ. विकास गोगटे यांची संस्थेस रु. एक लाखाची देणगी

संस्थेचे सभासद व नाशिकमधील निष्णात डॉ. विकास गोगटे यांनी त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपल्या संस्थेला १,००,०००/- ची देणगी दिली आहे.

विश्वस्त प्रा. दिलीप फडके यांनी संस्थेच्या वतीने देणगीचा साभार स्वीकार केला. डॉ. विकास गोगटे यांचे मनःपूर्वक आभार.

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या अध्यक्ष पदी ॲड.अविनाश भिडे यांची बिनविरोध निवड

आपल्या संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश भिडे यांची अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या अध्यक्षपदी ३ वर्षाकरिता बिनविरोध निवड झाल्याबद्दल श्री. अविनाशजी भिडे यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

# विंग कमांडर आनंद आगाशे यांना वायुसेनेचे शौर्य पदक

भारतीय वायुसेनेत विंग कमांडर पदावर कार्यरत नाशिकचे आनंद विनायक आगाशे यांना वायुसेनेचे शौर्य पदक गेल्या वर्षी जाहीर करण्यात आले होते.

दि. ८ ऑक्टोबर या भारतीय वायुदल दिनाच्या औचित्यावर नवी दिल्ली येथे झालेल्या विशेष सोहळ्यात आगाशे यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले.

दि. १५ ऑगस्ट २०२३ मध्ये मुसळधार पावसामुळे महाराणा प्रताप सागर तलावाचे पूर विसर्ग दरवाजे उघडले गेले होते. त्यामुळे हिमाचल प्रदेशच्या कांगडा जिल्ह्यातील गावांमध्ये पुराचे पाणी शिरले होते. पूरग्रस्त भागात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी, भारतीय हवाई दलाकडे मोहीम सोपविण्यात आली होती.

घटनास्थळी पोहोचल्यावर विंग कमांडर आगाशे यांनी बचावकार्य सुरू केले होते. पथकाच्या हवाई पाहणीत त्यावेळी पूरग्रस्त भागात शेकडो लोक घरांमध्ये आणि छतावर अडकलेले असल्याचे आढळून आले होते.

त्यावेळी हेलिकॉप्टर पथकाचे कमांडिग अधिकारी असलेले आनंद आगाशे यांनी पथकासह जोखीम पत्करून कामाचे काटेकोरपणे नियोजन केले होते. ही बचाव मोहीम यशस्वीपणे राबविण्यात त्यांच्या पथकाचे योगदान महत्वाचे ठरले होते. त्यांचे वडील विनायक आगाशे हेदेखील भारतीय नौदलाचे सेवानिवृत्त कमांडर आहेत. संस्थेच्या वतीने विंग कमांडर आनंद आगाशे यांचे मन:पुर्वक अभिनंदन...!

## सामुदायिक बोडण

अनेक कुटुंबांना वैयक्तिक अडचणींमुळे कौटुंबिक बोडण हल्ली शक्य होत नाही. त्यामुळे बऱ्याच दिवसांपासून सामुदायिक बोडणासंदर्भात विचारणा होत होती. आपल्या संस्थेच्या जागेचे काम पूर्ण झाल्याने यंदा रविवार दि. ३० नोव्हेंबर रोजी सामुदायिक बोडण आयोजित केले आहे.

बोडण संदर्भात अधिक माहितीसाठी आणि
नाव नोंदणीसाठी दिलेल्या नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. मंगला जोगळेकर. (९९२३००३३५४)**

**नांव नोंदणीची अंतिम तारीख :** १५ नोव्हेंबर २०२५

**स्थळ :** चित्तपावन ब्राह्मण संघ श्री परशुराम भवन




**पराग वैशंपायन**
फोटोग्राफर
**क्षणांचे सौंदर्य कॅमेऱ्यातून टिपतो..**
**आनंदी क्षणांच्या आठवणी आपुलकीने जपतो..**

* साखरपुडा फोटोग्राफी/व्हिडिओ
* प्रिवेडिंग फोटोशूट/व्हिडिओ
* ट्रेडिशनल वेडिंग फोटोग्राफी
* वेडिंग कँडिड फोटोग्राफी
* वेडिंग ट्रेडिशनल व्हिडिओ
* सिनेमॅटिक वेडिंग व्हिडिओ
* बेबीशॉवर शूट

*आधुनिक उपकरणांसह तरबेज टीम*

**ऑफीस : प्रभूशिल्प अपार्टमेंट, तपोवन रोड, नाशिक**
**9225762400 / 9405360834**

# "उच्च शिक्षणासाठी नवा पर्याय - सिंगापूर"

मागील लेखात आपण अमेरिकेच्या बदललेल्या व्हिसाच्या नियमांमुळे भारतीय विद्यार्थ्यांवर काय संकट ओढवले आहे हे पाहिले. पारंपरिकरित्या गेल्या अनेक दशकांपासून भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या देशांची निवड करीत आले आहेत. तसेच जर्मनी, फ्रान्स आणि इटली सारख्या युरोपीय देशांनाही विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे.

परंतु या देशांमध्ये आज भाषेचे निर्बंध, नोकऱ्यांची कमतरता, वाढता जीवन खर्च आणि स्थलांतर धोरणांमधील कठोरता यांसारखे मुद्दे ठळकपणे समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर आता विद्यार्थी नवे पर्याय शोधत आहेत आणि त्यात सर्वात आकर्षक, सुरक्षित आणि व्यवहार्य पर्याय म्हणजे सिंगापूर. आशियातील हे लहानसे पण अत्यंत प्रगत राष्ट्र आज उच्च शिक्षणाचे केंद्र (Education Hub) म्हणून ओळखले जाते.

सिंगापूर म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान, पराकोटीची शिस्त, कार्यक्षम प्रशासन आणि जागतिक दर्जाचे शिक्षण यांचे उत्तम मिश्रण आहे. येथील शिक्षण पद्धतीत तंत्रज्ञान, संशोधन, नवोन्मेष (innovation) आणि उद्योग क्षेत्राशी प्रत्यक्ष जोड यांना मोठे स्थान आहे.सिंगापूरने आपल्या उत्तम शैक्षणिक व्यवस्थेच्या, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आणि कठोर शिस्तीच्या जोरावर जागतिक शिक्षण क्षेत्रात एक वेगळे स्थान मिळवले आहे. येथे शिक्षणाचा दर्जा अत्यंत उच्च असून, जगातील अव्वल विद्यापीठांमध्ये गणल्या जाणाऱ्या संस्था येथे कार्यरत आहेत. संशोधन, नवकल्पना आणि उद्योगांशी थेट संलग्न अशी शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी नव्हे, तर नेतृत्व आणि नवोन्मेषासाठी तयार करते.

सुरक्षित वातावरण, स्वच्छ शहर व्यवस्था आणि बहुसांस्कृतिक समाज यामुळे सिंगापूरमध्ये शिकणे ही केवळ शैक्षणिक नव्हे तर जीवन घडवणारी अनुभव प्रक्रिया ठरते.

**सिंगापूरमधील प्रमुख विद्यापीठे -** सिंगापूरमध्ये काही विद्यापीठे सतत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असतात. त्यापैकी प्रमुख आहेत :

१. National University of Singapore (NUS) – आशियातील क्रमांक १ विद्यापीठ. विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय, संगणकशास्त्र आणि सामाजिक विज्ञान या क्षेत्रांमध्ये विशेष प्राविण्य.

२. Nanyang Technological University (NTU) – अभियांत्रिकी, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रात प्रसिद्ध.

३. Singapore Management University (SMU) – व्यवसाय, अर्थशास्त्र, कायदा आणि सामाजिक विज्ञान क्षेत्रातील विशेष शिक्षण.

४. Singapore University of Technology and Design (SUTD) – डिझाईन थिंकिंग आणि नवकल्पनांवर भर देणारे विद्यापीठ मात्र येथे प्रवेश मिळणे अतिशय अवघड आहे. पूर्व अभ्यासक्रमामध्ये उत्तम सी.जी.पी.ए आणि आय.ई.एल.टी.एस या परीक्षेत उत्तम स्कोअर हे महत्त्वाचे पॅरामिटर्स आहेत.

स्थानिक विद्यार्थ्यांना देखील विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी स्पर्धा असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना आयटी, बँकिंग, अभियांत्रिकी, जैवतंत्रज्ञान, मार्केटिंग आणि पर्यटन या क्षेत्रांत विपुल रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांची मुख्य कार्यालये सिंगापूरमध्ये असल्याने, रोजगार मिळविण्याची शक्यता अधिक असते.

या देशातील शिक्षण खर्च अमेरिका किंवा इंग्लंडच्या तुलनेत खूपच कमी आहे. पण गुणवत्तेच्या दृष्टीने तो समान दर्जाचा आहे. वार्षिक शिक्षण शुल्क सरासरी SGD २०,००० ते ४०,००० दरम्यान असते.

विदेशी विद्यार्थ्यांसाठी NUS, NTU, SMU आणि सरकारतर्फे Tuition Grant Scheme, ASEAN Scholarship यांसारख्या शिष्यवृत्त्या उपलब्ध आहेत. आधुनिक कॅम्पस, पराकोटीची स्वच्छता आणि सुरक्षितता, उत्तम वाहतूक व्यवस्था यामुळे सिंगापूरमध्ये शिक्षण घेणे हा एक समृद्ध करणारा अनुभव ठरतो.

**– यास्मिन दांडेकर**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# इमारत निधी ऑक्टोबर २०२५ - देणगीदार

कै. र. के. पटवर्धन स्मृती श्री परशुराम भवन प्रकल्पासाठी ऑक्टोबर २०२५ मध्ये जमा झालेल्या देणग्या

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | सौ. मेधा जयंत कुलकर्णी | १,६१,०१६/- |
| ०२ | डॉ. श्री. विकास विष्णू गोगटे | १,००,०००/- |
| ०३ | श्री. सुधीर आत्माराम कार्लेकर | २५,०००/- |
| ०४ | श्री. दत्तात्रय मेघशाम वाटवे | २१,०००/- |

*** संस्थेच्या कार्यालय वेळेत बदल ***

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक या आपल्या संस्थेच्या ऑफिस ची वेळ

**दि. १ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी १० ते दुपारी २ व दुपारी ४ ते रात्री ८**

अशी करण्यात आलेली आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

ATT OVERSEAS
Education Advisors

# ATT OVERSEAS Education Advisors

Training for

IELTS | SAT | PTE | GRE

Assistance in

University & Program Selection | Admission Process | Visa & Interview

USP
- Limited batch size
- Flexible timings
- Interactive learning environment
- Personal attention




Director
**Yasmin Dandekar**


70302 36222 attnsk20@gmail.com

4, Alap Apartments, above Chai Ketli Cafe, D'Souza Colony, off College Road, Nashik


...आम्ही फक्त सोनं विकत घेतो
संपर्क: पवित्र टकले
९८२२०५७०००
तुमच्या जुन्या सोन्याला सर्वोत्तम दर
टकले
ओल्ड गोल्ड
६०१, ६वा मजला, सिद्धी पूजा
बिजीनेस स्क्वेअर, लेले हॉस्पिटल
मागे, कुलकर्णी गार्डन जवळ,
शरणपुर रोड, नाशिक - ४२२००२



संस्थेचे सभासद व नाशिक मधील
निष्णात डॉ.विकास गोगटे यांची संस्थेस देणगी...
विश्वस्त प्रा. दिलीप फडके यांनी संस्थेच्या वतीने देणगीचा
साभार स्वीकार केला.




## ⁕ संस्थेच्या कार्यालय वेळेत बदल ⁕

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक या आपल्या संस्थेच्या ऑफिस ची वेळ दि. १ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी १० ते दुपारी २ व दुपारी ४ ते रात्री ८ अशी करण्यात आलेली आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति,

## संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.